जा.क्र. 8538/2018
धर्मादाय आयुक्त भवन
३ रा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
दिनांक : 09 OCT 2018.

**परिपत्रक क्र.** ५५१ **दिनांक** ०९.१०.२०१८.

मा.उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या योजनेने धर्मादाय रुग्णालयांना, त्यांचेकडील (MSW) वैद्यकीय समाजसेवकाद्वारे, गरीब व निर्धन रुग्णांचा आर्थिक दर्जा तपासणेबाबत प्राधिकृत केले आहे. जेणेकरून MSW हे गरीब व निर्धन रुग्णांना योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यास मदत करेल व त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करेल. याकरीता MSW चे वर्तन हे नम्र व सहानुभूतीचे असणे अत्यंत आवश्यक आहे.

तथापि, या कार्यालयाच्या असे निर्दशनास आले आहे की, धर्मादाय रुग्णालयांनी नेमलेले MSW हे गरीब व निर्धन रुग्णांना अथवा त्यांचे नातेवाईकांना चांगली/सहानुभूतीपुर्वक वागणूक न देता त्यांचेशी उद्धटपणे, वागतात. याबाबत या कार्यालयाकडे लेखी व मौखिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. MSW ने असे बेजबाबदार वागणे हे अभिप्रेत नाही.

तरी, अधिनस्त सर्व जिल्हा कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी त्यांचे जिल्हयातील सर्व धर्मादय रुग्णालयांना असे निर्देश दयावेत की, त्यांचेकडील MSW हे रुग्णांशी/त्यांच्या नातेवाईकांशी नम्रपणे, सहानुभूतीपुर्वक व सौजन्याने वागतील, जेणेकरुन निर्धन व दुर्बल रुग्ण योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेऊ शकतील.

९/१०/१८
(श्री. शि.ग.डिगे)
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. अधिक्षक (रुग्णालय शाखा / आस्थापना शाखा), मुख्यालय
६. संगणक शाखा, मुख्यालय(प्रत वेबसाईटवर अपलोड कण्यासाठी)